आणीबाणीचे काळे दिवस संपून पहिल्यांदाच विरोधी पक्षांकडे सत्ता होती. आम्हां सर्व कार्यकर्त्यांच्यात नवचैतन्य आले होते. आणीबाणीमुळे आणखी घरे जोडली होती. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांत मुंबईच्या यशातला माझा वाटा सर्वश्रुत होता. त्यामुळे माणसांचा अखंड स्त्रोत सुरु होता. सुब्रमण्यम स्वामी (ते तेव्हा मुंबईतून खासदार म्हणून निवडून आले होते) ते थेट इंदिरा गांधींचा पराभव करणारे केंद्रिय आरोग्य मंत्री श्री. राज नारायण अशी अनेक पूर्वी वेगळ्या पक्षांमध्ये असलेली मोठी मंडळी आली, माझे अगणित सहकारी आले. पण आज 35 वर्षानंतरही सुगंध जाणवतो तो सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांनी येऊन शुभाशीर्वाद म्हणून दिलेल्या चाफ्याच्या फुलांचा. गोळवलकर गुरुजींमुळे प्रेरीत होऊन समाजकार्याला सुरुवात करणा-या मला स्वतः सरसंघचालकांनी येऊन तब्येतीची वास्तपुस्त करावी याचा मोठाच आनंद वाटला.

जनता पार्टीच्या पहिल्या संघटनात्मक निवडणुका झाल्या. आम्हा जनसंघीयांना संघटनात्मक निवडणुकीसाठी मतदान हे थोडे आश्चर्याचेच वाटले. आमच्याकडे अध्यक्ष एकमताने निवडण्याची परंपराच निर्माण झाली होती. मात्र जनता पार्टीच्या निवडणुकांत प्रत्येक घटक पक्षाचा विचार करता ते सहज शक्य नव्हते. मतदान झाले व मुंबईचा अध्यक्ष म्हणून माझी निवड झाली.

लोकसभेच्या निवडणुकीच्या पाठोपाठ 1978 मध्ये महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक झाली. माझ्यासारख्याने विधानसभा निवडणूक लढविली तर ते पक्षाला सोयीचे होईल असे मत वरिष्ठ सहकारी पदाधिका-यांनी व्यक्त केले. खरं म्हणजे मी गोरेगावात राहाणारा, मुख्यतः गोरेगावचाच राजकीय कार्यकर्ता. परंतु त्यावेळच्या खासदार श्रीमती मृणाल गोरे यांनी श्री. बाबुराव सामंत यांनाच गोरेगाव मधून विधानसभेची उमेदवारी दिली पाहिजे असा आग्रह धरला. राम नाईकांनी संघटन मंत्री म्हणून संपूर्ण मुंबईत काम केले असल्यामुळे ते कुठुनही निवडणूक लढवू शकतात, असाही त्यांचा तर्क होता. त्यामुळे जनसंघातल्या सर्व वरिष्ठांनी मी बोरीवलीतून विधानसभा निवडणूक लढवावी असे ठरविले. त्या निवडणुकीत मी प्रचंड बहुमतांनी विजयी झालो. मुंबईतील 34 च्या 34 विधानसभा मतदार संघात जनता पक्ष आणि सहकारी पक्ष विजयी झाले. त्यानंतर 1980 मध्ये मध्यावधी निवडणुका झाल्या. जनता पार्टीतून समाजवादी गट बाहेर पडून केंद्रात सत्तापालट झाल्याचा विपरीत परिणाम महाराष्ट्राच्या निकालावर झाला. तरीही मुंबईत जुन्या जनसंघातले आम्ही पाचजण निवडून आलो. 1985 च्या विधानसभा निवडणुकीतही मी विजयी झालो. मतदारसंघात काम करणारा आमदार तसेच विधिमंडळ सभागृहातही जनतेचे प्रश्न मांडणारा अभ्यासू आमदार म्हणून माझा लौकिक वाढला. आमदारकीच्या काळात श्री. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना मी मांडलेली आमदार निधीची कल्पना त्यांनी मंजूर केली. आमदार निधी सुरु झाला. झोपडपट्टीमध्ये पहिल्यांदाच दुमजली संडास, फिरते शौचालय, पाण्यासाठी कुपनलिका आदी नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे जनमानसात माझी लोकप्रियता वाढत होती. वाढत्या लोकप्रियतेला संघटनेची प्रभावी साथ निर्माण करण्यातही मी यशस्वी झालो. एकाचवेळी आमदार व मुंबईसारख्या महानगराचा अध्यक्ष अशा जबाबदा-या पार पाडल्या.

### भाजपाची स्थापना

1980 साली लोकसभेच्या झालेल्या निवडणुकीच्यावेळी मी जनता पक्षाचा अध्यक्ष होतो. जनता पक्षाचे सरकार पाडून बाहेर पडलेल्या समाजवादी मंडळीत श्रीमती मृणाल गोरे याही होत्या. मुंबईतील सर्वच कार्यकर्ते त्यामुळे दुखावले होते. परिणामी त्यांच्या विरोधात आम्ही जिद्दीने निवडणूक लढविली. मुंबईकरांना अपरिचित असलेले परंतु आणीबाणीच्या लढ्यात संघटना काँग्रेसचे नेतृत्व केलेले श्री. रविंद्र वर्मा हे विजयी व्हावेत म्हणून उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातील प्रचाराची धुरा मुंबईचा अध्यक्ष म्हणून मुख्यतः माझ्याकडे होती. त्या निवडणुकीत श्री. रविंद्र वर्मा विजयी झाले. श्रीमती मृणाल गोरे पराभूत झाल्या. इतकेच नव्हे तर मुंबईतील लोकसभेच्या सहापैकी पाच जागा आम्ही जिंकल्या. देशभरात जनता पक्षाचे जे पतन झाले त्याच्या तुलनेत मुंबईचे यश हे स्पृहणीय होते. अध्यक्ष म्हणून मला सर्वांनी नावाजले. परंतु जनता पक्षामध्ये समाजवादी विचारसारणीच्या नेत्यानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य असलेल्या कार्यकर्त्यांच्याबद्दल दुहेरी सदस्यत्वाचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यामुळे निर्माण झालेले वादळ शमले नव्हते. अखेर 1980 मध्ये भारतीय जनसंघाचे कार्यकर्ते तसेच त्यांचे समविचारी कार्यकर्ते जनता पक्षातून बाहेर पडले आणि दिल्ली येथे 6 एप्रिल 1980 रोजी भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली. त्यानंतर डिसेंबर 1980 मध्ये भाजपाचे पहिले महाअधिवेशन मुंबईतील वांद्रे येथे समतानगरमध्ये संपन्न झाले. त्या अधिवेशनाला देशभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. 15,000 कार्यकर्ते येतील असे वाटत होते. परंतु अपेक्षेपेक्षाही फार मोठ्या संख्येने जवळजवळ 58,000 कार्यकर्ते आले. तरीही अधिवेशनाच्या सर्व व्यवस्था अतिशय उत्तम राहू शकल्या. त्यावेळी मी मुंबई भाजपाचा अध्यक्ष होतो. केंद्रिय कार्यकारिणीत अधिवेशनाच्या व्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी मी आपणहून घेतली होती. सर्व सहका-यांनी अहोरात्र मेहनत घेतल्याने ती पूर्ण करु शकलो. एवढ्या मोठ्या स्तरावरचे ते मुंबईतले पहिले अधिवेशन होते. याच अधिवेशनात श्री. अटल बिहारी वाजपेयींच्या अध्यक्षीय भाषणातील ''काळोखी रात्र संपेल, सूर्योदय होईल, कमळ फुलेल'' या वाक्याने कार्यकर्त्यांच्यात प्रचंड उत्साह निर्माण झाला तर पाहुणे म्हणून आलेल्या निवृत्त मुख्य न्यायमूर्ति एम. सी. छगला यांनी ''माझ्या समोर लघु भारत आहे तर उजव्या हाताला बसलेले श्री. अटल बिहारी वाजपेयी हे भावी पंतप्रधान आहेत'' अशा व्यक्त केलेल्या शुभेच्छांमुळे हे अधिवेशन देशभर गाजले. मुंबई भाजपाचा अध्यक्ष म्हणून देशभरच्या कार्यकर्त्यांना मी माहित झालो.

1985 साली पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाली. त्यामुळे त्यानंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कै. राजीव गांधी यांना अभूतपूर्व यश मिळाले. पाठोपाठ झालेल्या विधानसभा